# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. १३
## सभावृत्तांत

दिनांक :- १६/३/२०१६ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १६/३/२०१६ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.शमीम पठाण
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा.अपर्णा निलेश डोके
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.साबळे छाया जगन्नाथ
९. मा.विमलताई जगताप
१०. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
११. मा.बारणे निलेश हिरामण
१२. मा.माया संतोष बारणे
१३. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१४. मा.शरद माणिकचंद लुणावत स्वीकृत सदस्य
१५. मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. देवण्णा गट्टुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.रामदास तांबे - कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर. निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.आबासाहेब ढवळे – उपअभियंता, बांधकाम परवानगी विभाग, मा.गणेश देशपांडे, मुख्य आरोग्य निरिक्षक इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १२, दि. २९/२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ प्रभाग क्रमांक ५१ गणेशनगर , बेलठिकानगर थेरगांव गुजरनगर येथील रस्त्यास साईनाथ कॉलनी गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माया बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ चिंचवड मोरया गोसावी मंदिर परिसरामधील सुखकर्ता अपार्टमेंट शेजारील मनपाचे आरक्षण क्रमांक २२५ मधील उदयानाकरीता आरक्षण आहे. उदयानाकरीता आरक्षीत असलेलया उदयानास जिजाऊ उदयान असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामधील कॅन्टीन व स्नॅक कॉऊटर जोशी बंधू केटरर्स चिंचवड यांना ११ महिन्यासाठी भाडे तत्वावर देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शमीम पठाण यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक ४२ ब प्रभाग क्षेत्रीय पिंपरी चिंचवड मनपामधील स्मशानभुमीचे काम ब प्रभागांतर्गत आरोग्याचे साफसफाईचे , नाला सफाईचे काम माता रमाई आंबेडकर बेरोजगार स्वयसेवी संस्था या संस्थेस काम देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.छाया साबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ प्रभाग क्रमांक २३ मधील गोयल गरिमा सोसायटी समोरील खेळाचे मैदानासाठी आरक्षीत असलेल्या आरक्षण क्र.२३३ मधील मैदानासाठीची मोकळी जागा पिंपरी चिंचवड मनपाच्या ताब्यात आली असून सदरच्या मैदानाला समर्थ क्रिडांगण असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अपर्णाताई डोके यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७ प्रभाग क्रमांक २३ मधील जिजाऊ उदयानाच्या कमानीस १) राजमुद्रा २) बालशिवाजी सहीत जिजामाता यांचे म्युरल बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अपणाताई डोके यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ८ प्रभाग क्रमांक २० मध्ये ब प्रभाग समितीमध्ये ठराव क्रमांक ७८ दिनांक २९/२/२०१६ नुसार रस्टन कॉलनीतील कमानीस रस्टन ग्रीव्हज हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेत आले आहे. सदर कमानीस डावीकडे ए, बी, सी, हौसिंग सोसायटी क्रमांक २ उजवीकडे ए, बी, सी हौसिंग सोसायटी क्रमांक १ असे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास तसेच प्रभाग क्रमांक २० मध्ये बळवंतनगर श्रीराम कॉलनी नं.६ येथील महादेव मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर महादेव मंदिराकडे असे दिशादर्शक फलक लावणे व प्रभाग क्रमांक २० मध्ये वाल्हेकरवाडी रोडवरील रानमळा हॉटेल समोरील कॉलनीस औदुबर हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आशाताई सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ९ चिंचवडगांव प्रभाग क्र.२२ मधील उर्दुशाळा चापेकर चौक येथील क्रा. चापेकर विदया मंदिर इमारतीत स्थलांतरीत करुन पिंपरी चिंचवड मनपाच्या चिंचवड अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा केंद्रास इमारत उपलब्ध करुन देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १० चिंचवडगांव प्रभाग क्र.२२ मधील श्री मरीआई लक्ष्मी मंदिर प्रवेशव्दार – श्री काळभैरवनाथ उत्सव समिती व चिंचवड ग्रामस्थ तसेच समोरील बांधण्यात आलेल्या चवथ-यास डॉ.बाबा साहेब आंबेडकर व्यासपिठ असे नांव देवून त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ११ चिंचवडगांव प्रभाग क्रमांक २२ मधील वेताळ बुवा मंदिरासमोरील कमानीस श्री वेताळ बुवा मंदिर प्रवेशव्दार – श्री काळभैरवनाथ उत्सव समिती व चिंचवड ग्रामस्थ असे नांवे देण्यास व त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १२ चिंचवडगांव प्रभाग क्रमांक २२ मधील कै.बळवंत राघुजी चिंचवडे व्यायाम शाळेच्या नावामध्ये दुरुस्ती करुन कै.बळवंत राघुजी चिंचवडे व्यायाम शाळा व योग साधना केंद्र असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १३ प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर येथील दगडोबा चौकाच्या पुढील व संकल्प गार्डन चौकाच्या खालील बाजूस कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पाटील) चौक असे नांव देणेस व त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे ॲड.संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ८० — विषय क्र. १

दि. १६/३/२०१६ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. निलेश बारणे — अनुमोदक: मा.माया संतोष बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील जुलै, २०१६ रोजीच्या सभेचे वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८१ विषय क्र. २
दि. १६/३/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.माया संतोष बारणे अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दिनांक १६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५१ गणेशनगर , बेलठिकानगर थेरगांव गुजरनगर येथील रस्त्यास साईनाथ कॉलनी गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सवारनुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८२ विषय क्र. ३
दि. १६/३/२०१६ विभाग – १. स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२. उदयान विभाग
३. माहिती व जनसंपर्क विभाग
सुचक : मा.ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव . अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड मोरया गोसावी मंदिर परिसरामधील सुखकर्ता अपार्टमेंट शेजारील मनपाचे आरक्षण क्रमांक २२५ मधील उदयानाकरीता आरक्षण आहे. उदयानाकरीता आरक्षीत असलेलया उदयानास जिजाऊ उदयान असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. ८३ विषय क्र.४
दि. १६/३/२०१६ विभाग - १. भुमि आणि जिंदगी विभाग
२.ब क्षेत्रीय कार्यालय
(भुमि आणि जिंदगी विभाग)
सुचक : मा.शमीम पठाण . अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. शमीम पठाण यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड प्रेक्षागृहामध्ये प्रेक्षकांसाठी कॅन्टीन व स्नॅक कॉऊंटरची सोय आहे. सध्या सदर कॅन्टीन व स्नॅक कॉऊंटर मे.काची केटरर्स हे चालवित आहेत. मे.काची केटरर्स यांची मुदत संपल्यानंतर वरील मिळकतीमधील कॅन्टीन व स्नॅक कॉऊंटर श्री.जोशी बंधू केटरर्स यांना ११ महिन्यासठी मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्रमांक भुजि/१/कावि/१५६/२०१३, दिनांक २०/४/२०१३ मधील अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८४ | विषय क्र.५
दि. १६/३/२०१६ | विभाग १. वैदयकिय किभाग (मुख्य.कार्या.)
२ ब क्षेत्रीय कार्या. (स्थापत्य)
३. ब क्षेत्रीय कार्यालय (आरोग्य )
४. आरोग्य विभाग ( मुख्य कार्यालय)

सुचक : मा.छाया जगन्नाथ साबळे . अनुमोदक: मा. आशाताई सुर्यंवशी

संदर्भ :- मा. छाया साबळे यांचा दिनांक दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ४२ ब प्रभाग क्षेत्रीय कार्यालय मनपा मधील स्मशानभुमीचे देखभालीचे काम ब प्रभागांतर्गत आरोग्याचे साफसफाईचे , नाला साफसफाईचे काम माता रमाई आंबेडकर स्वयंसेवी सह.संस्था या संस्थेस काम देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८५ | विषय क्र.६
दि. १६/३/२०१६ | विभाग – १. स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२. क्रिडा व सांस्कृतिक विभाग
३. माहिती व जनसर्पक विभाग

सुचक : मा.अपर्णाताई डोके . अनुमोदक: मा. आशाताई सुर्यंवशी

संदर्भ :- मा. अपर्णाताई डोके यांचा दिनांक दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २३ मधील गोयल गरिमा सोसायटी समोरील खेळाचे मैदानासाठी आरक्षीत असलेल्या आरक्षण क्र.२३३ मधील मैदानासाठीची मोकळी जागा पिंपरी चिंचवड मनपाच्या ताब्यात आली असून सदरच्या मैदानाला समर्थ क्रिडांगण असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८६ | विषय क्र.७
दि. १६/३/२०१६ | विभाग – १. स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२. उदयान विभाग स्थापत्य

सुचक : मा.अपर्णाताई डोके . अनुमोदक: मा. आशाताई सुर्यंवशी

संदर्भ :- मा. अपर्णाताई डोके यांचा दिनांक दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २३ मधील जिजाऊ उदयानाच्या कमानीस १) राजमुद्रा २) बालशिवाजी सहीत जिजामाता यांचे म्युरल बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८७ | विषय क्र.८
दि. १६/३/२०१६ | विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.आशाताइर सुर्यंवशी . अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ :- मा.आशाताई सुर्यवंशी यांचा दिनांक दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २० मध्ये ब प्रभाग समिती ठराव क्रमांक ७८ दिनांक २९/२/२०१६ नुसार रस्टन कॉलनीतील कमानीस रस्टन ग्रीव्हज हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेत आले आहे. सदर कमानीस डावीकडे ए, बी, सी, हौसिंग सोसायटी क्रमांक २ उजवीकडे ए, बी, सी हौसिंग सोसायटी क्रमांक १ असे

फलक लावणेकामीच्या प्रस्तावास तसेच प्रभाग क्रमांक २० मध्ये बळवंतनगर श्रीराम कॉलनी नं.६ येथील महादेव मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर महादेव मंदिराकडे असे दिशादर्शक फलक लावणे व प्रभाग क्रमांक २० मध्ये वाल्हेकरवाडी रोडवरील रानमळा हॉटेल समोरील कॉलनीस औदुबर हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाना.

ठराव क्र. ८८ विषय क्र.९
दि. १६/३/२०१६ विभाग – १. शिक्षण मंडळ
२. सार्व.वाचनालय विभाग
३. भुमि आणि जिंदगी विभाग

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. ॲड.संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवडगांव प्रभाग क्रमांक २२ मधील मरहूम फकीरभाई पानसरे उर्दु शाळा यांना R.T.E. २००९ निकषानुसार खेळाचे मैदान मोकळी जागा व संरक्षक भिंत नसल्यामुळे विदयार्थी , पालक व आजुबाजूचे नागरीक यांना गैरसोय निर्माण होते. व क्रा.चापेकर चौक येथे पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळाच्या चार शाळा कमी होवून दोनच शाळा सुरु आहेत त्याठिकाणी इमारत उपलब्ध असल्यामुळे तेथे उर्दु शाळा स्थलांतरीत करण्यात यावी व चिंचवड अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा केंद्रातील विदयार्थ्यांना जागा अपुरी पडत असल्यामुळे वाढती मागणी लक्षात घेता स्पर्धा परिक्षा केंद्र व आभ्यासिका शेजारील उर्दु शाळेची इमारत पिं.चिं.म.न.पा.च्या स्पर्धा परिक्षा केंद्र व आभ्यासिकेस उपलब्ध करुन देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ८९ विषय क्र.१०
दि. १६/३/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २२ मधील श्री मरीआई लक्ष्मी मंदिर प्रवेशव्दारास चिंचवड श्री मरीआई लक्ष्मी मंदिर प्रवेशव्दार – श्री काळभैरवनाथ उत्सव समिती व चिंचवड ग्रामस्थ तसेच समोरील बांधणेत आलेल्या चवथ-यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठ असे नांवे देवून त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ९० विषय क्र.११
दि. १६/३/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवडगांव प्रभाग क्रमांक २२ मधील वेताळ बुवा मंदिरासमोरील कमानीस श्री वेताळ बुवा मंदिर प्रवेशव्दार – श्री काळभैरवनाथ उत्सव समिती चिंचवड ग्रामस्थ असे नांव देवून त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा इराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ९१ विषय क्र.१२

दि. १६/३/२०१६ विभाग – १. क्रिडा व कला सांस्कृतिक विभाग

२. स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

३. भुमि आणि जिंदगी विभाग

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे

संदर्भ :- मा. अश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड प्रभाग क्रमांक २२ मधील कै.बळवंत राघुजी चिंचवडे व्यायाम शाळेच्या नावांमध्ये दुरुस्ती करुन कै.बळवंत राघुजी चिंचवडे व्यायाम शाळा व योग साधना केंद्र असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ९२ विषय क्र.१३

दि. १६/३/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा दि.१६/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवडेनगर येथील दगडोबा चौकाच्या पुढील व संकल्प गार्डन चौकाच्या खालील बाजूस कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पाटील) चौक असे नांव देणेस व त्याप्रमाणे फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,

ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३

जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१७७/२०१६.

दिनांक : २१/०३/२०१६

सही/-

प्रशासन अधिकारी तथा

सचिव( सभाशाखा )

ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना